# Washim District Police

**Nature of Work** :- **"Balsnehi" Police Staion**

**Police Station** :- **Washim Rural**

**Date of Good Work done** :- **26/06/2022**

**Brief of the work done :-**

विधिसंघर्षग्रस्त व संरक्षण व काळजीची गरज असणाऱ्या बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा व समाजाच्या विकासात त्यांचे योगदान मिळावे या पो.अ.श्री. बच्चन सिंह (भा.पो.से.) यांच्या संकल्पनेतून पो.स्टे. वाशीम ग्रामीण येथे 'बालस्नेही पोलीस स्टेशन'ची स्थापना करण्यात आली आहे.

पुण्य नगरी

**जिल्हा पोलीस दलाचा उपक्रम; 'होप फॉर चिल्ड्रेन' संस्थेचा सहभाग**

## वाशीम येथे 'बालस्नेही पोलीस स्टेशन' कार्यान्वित



वाशीम, दि. २५ (प्रतिनिधी)

**वाशीम : जिल्हा पोलीस दलाकडून महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने नवनविन संकल्पना राबवून प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख बनविण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून वाशीम ग्रामीण रुग्णालयात जिल्ह्यातील पहिले 'बालस्नेही पोलीस स्टेशन' कार्यान्वित करण्यात आले. 'होप फॉर चिल्ड्रेन' या संस्थेच्या सहभागातून कार्यान्वित करण्यात आलेल्या उपक्रमाचे उद्घाटन २६ जून रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांच्या हस्ते करण्यात आले.**



सद्यस्थितीत लहान बालकांचा गुन्हेगारी क्षेत्रातील सहभाग वाढत असून वाशीम जिल्ह्यात सन २०२०-२२ मध्ये विधीसंघर्षग्रस्त १८, बालकामगार ११, बालविवाह - ०२, पॉस्कोसह भादंवि ३७६-५९, भादंवि ३५४ -१००, भादंवि ३६३-०९ बालकांची हि आकडेवारी चिंताजनक आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न म्हणून कोणत्याही कारणाने पोलीस स्टेशनला आलेल्या बालकाला त्याच्या मनोरंजनासाठी साहित्य, खेळणी विविध माहिती पत्रके लावून प्रसन्न आनंदी व हसतखेळत वातावरण निर्मिती केल्यास बालकांना स्वच्छंदी व निर्भीड वातावरणात आपले म्हणणे सुव्यवस्थित मांडता येईल. बालकांमध्ये पोलिसांप्रती आपलेपणाची व विश्वासाची भावना निर्माण होऊन त्यांचे मतपरिवर्तन करणे शक्य होईल. या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांनी पुणे येथे पोलीस उपआयुक्त (गुन्हे) यापदी कार्यरत असताना महाराष्ट्रात सर्वप्रथम त्यांनी पो.स्टे. लष्कर, जि. पुणे येथे या अभिनव संकल्पनेची सुरुवात केली होती. सदर उपक्रम वाशीम येथे सुरु करण्याच्या हेतूने 'होप फॉर चिल्ड्रेन' संस्थेचे सहकार्य घेण्यात आले. वाशीम ग्रामीण येथे परिविक्षाधीन सहायक पोलीस अधीक्षक महक स्वामी यांच्या नेतृत्वाखाली 'बालस्नेही पोलीस स्टेशन'ची स्थापना करण्यात आली आहे.

" बालस्नेही पोलीस स्टेशन हे फक्त विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठीच नसून सर्व बालकांसाठी आहे. यामध्ये पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बालकांचाही समावेश होतो. पोलीस स्टेशन वाशीम ग्रामीण येथील ११ महिला अंमलदारांचे मुलेसुद्धा बालस्नेही कक्षा' स भेट देतात. याठिकाणी मनसोक्त खेळत, बागडत, अभ्यास करीत असल्याने ही संकल्पना आवडल्याचे ते सांगतात. अशाप्रकारच्या उपक्रमांमुळे विधीसंघर्षगस्त बालके नशेपासून गुन्हेगारीपासून दूर होऊन चांगल्या वळणाला लागून समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देतील या हेतूने सदर उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे.

**- महक स्वामी**
ठाणेदार ग्रामीण पोलीस स्टेशन, वाशीम

**Smart Washim**
Page No.2 June 26, 2022